गोष्टीच गोष्टी भाग-६

पराक्रमी स्त्रिया

आशा परुळेकर



BVBK-0402550

विमल प्रकाशन

प्रकाशक व मुद्रक :
विनोद सरपोतदार
विमल प्रकाशन
६९३ नारायण पेठ, जोशी भवन,
कुंटे चौक, पुणे ४११०३०

© आशा परुळेकर

प्रथमावृत्ती : जानेवारी १९९१

मूल्य: १३/-

मुखपृष्ठ व आतील चित्रे :
चंद्रमोहन कुलकर्णी

टाईपसेटिंग :
प्रमोद प्रिंटर्स
(प्रमोद वि. बापट)
विद्याधर अपार्टमेंट्स
११२०, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०

मुद्रणस्थळ :
स्मिता प्रिंटर्स
(प्रमोद वि. बापट)
१०१९, सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ,
पुणे ४११०३०

म. वं. सं. डाबें, अहिल्यालय ठाणे.
बाल साहित्य 'कपाट'
क्र. क २५५० दिनांक २२।१।१७
विषय बा.क.

अहिल्याबाई होळकर



BVBK-0402550

इ. स. १७३३ चा काळ होता. मल्हारराव होळकर आणि त्यांचे साथीदार देशाची सैर करून घरच्या मार्गाला लागले होते. रात्र पडत आली होती. औरंगाबादजवळच्या चौंघी गावातील देवळात रात्रीचा मुक्काम करण्याचे ठरले. पहाटे उठून मल्हारराव पुढच्या प्रवासासाठी प्रयाण करणार होते.

मल्हारराव ओवरीत थोडे विसावले नसतील तो गावकऱ्यांची गर्दी होऊ लागली. देवीच्या सायंपूजेचा समय होता. एवढ्यात मल्हाररावांची नजर मंदिराच्या प्रवेशद्वारावर गेली. दहा-बारा वर्षांची एक परकरी मुलगी हातात पूजेची थाळी घेऊन येत होती. तिची सोज्वळ मुद्रा, चेहऱ्यावरील निरागस भक्तिभाव आणि मर्यादशील चाल पाहून मल्हारराव प्रसन्न झाले. त्यांच्या मनात आले, 'ही पोर माझ्या घरी सून म्हणून आली तर ?' "काय हो गावकरी, ही मुलगी कोणाची ?" त्वरित त्यांनी शेजारी उभ्या असलेल्या गावकऱ्याला विचारले.

मल्हाररावांचा मुलगा खंडेराव देखणा, तरणाबांड आणि शूर होता. परंतु लाडाने आणि वाईट संगतीत सापडल्याने थोडा वहावला होता. मल्हाररावांनी म्हणूनच सून आणण्याचे ठरवले होते. "माणकोजी पाटलांची लेक आहे ती ! अहिल्या तिचं नाव आहे. फार गुणी पोर आहे." गावकऱ्याने शिफारस केल्यावर मल्हाररावांनी त्वरित पाटलांच्या घराचा पत्ता गाठला. शुभ कार्याला उशीर कशाला ?

१४ मे १७३३ साली अहिल्या पाटील, इंदोरच्या सरदार होळकरांची सून म्हणून इंदूरला त्यांच्या भव्य वास्तूत प्रवेशली. आणि इतिहासात एका भारतीय स्त्रीच्या वीरगाथेची सुरुवात झाली. अहिल्या जात्याच अतिशय तल्लख बुद्धिमत्तेची, चतुर आणि लाघवी स्वभावाची होती. लग्नानंतर काही दिवसांतच खंडेरावाचे वाह्यात वर्तन तिच्या ध्यानी आले. परंतु आपल्या पतीवरील प्रेम आणि आदरात तिने फरक पडू न देता त्याला सुधारण्याचे ठरवले. गौतमीबाईंना– तिच्या सासूला अहिल्येचे धोरण उमगले आणि ती मनोमन सुखावली. आपल्या सुनेचे असामान्य व्यक्तिमत्व गौतमीबाई आणि मल्हाररावांच्या केव्हाच ध्यानी आले. मल्हाररावांनी अहिल्येला युद्धकला आणि राजकारणात निपुण करण्याचे ठरवले. आपल्या मुलाच्या आयुष्याला अहिल्या चांगले वळण देईल, हे त्यांनी हेरले होते.

मल्हाररावांच्या तालमीत युद्ध, न्याय, राज्यव्यवस्था, घोडदौड अशा अनेक कलांत अहिल्येने अपार नैपुण्य मिळवले. खंडेरावांना तिने वाईट व्यसनांपासून परावृत्त करण्याचा दुसरीकडे चंग बांधला. पुराणातील शूर, देशभक्त वीरांच्या कथा आणि नैतिकतेच महत्त्व त्यांना ती पटवून देऊ लागली. खंडेराव लहान बालकाप्रमाणे होते. देखण्या, चतुर आणि लाघवी अहिल्येच्या रूपात त्यांना पत्नी, सखी आणि सल्लागार भेटली होती. त्यांच्या व्यसनांपासून ते परावृत्त झाले.

कालांतराने अहिल्येने मुक्ताला जन्म दिला. तरीही तिची राजकारणातील गोडी आणि गती तीळभरही कमी झाली नव्हती. मल्हाररावांचा तर ती उजवा हात बनली. अहिल्येच्या जाणकार हाती राज्याचा भार सोपवून मल्हारराव मोठमोठ्या मोहिमांना जाऊ लागले. घोड्यावर स्वार होऊन अहिल्या साऱ्या राज्यात रपेट मारे. जातीने न्यायनिवाडा करे. गोरगरिबांची विचारपूस करत असे. मुक्ताच्या पाठीवर

तिला मुलगाही झाला होता. मालेराव अतिशय खोडकर आणि उनाड होता. गावकऱ्यांच्या खोड्या काढून तो त्यांना छळत असे. अहिल्येने आपल्या न्यायनिवाड्यात त्यालाही कडक शिक्षा केली आणि आपल्या राज्यात सुव्यवस्था आणि शांतता प्रस्थापित केली. आपले पुत्रप्रेम कर्तव्याच्या आड न येण्याची खबरदारी घेतली.

मल्हारराव आणि खंडेरावांबरोबर कधी कधी एखाद्या मोहिमेलाही ती जात असे. कुंभारी किल्ल्याला होळकरांनी वेढा घालून सुरजमल जाटाला नमवण्याचे ठरवले होते. राघोबा पेशव्यांनीही होळकरांना साथ दिली होती. किल्ल्याबाहेरील खंदकाच्या जवळ घनघोर लढाई चालली होती. खंडेरावांची तलवार विजेप्रमाणे तळपत, शत्रूचा निःपात करत होती. मल्हारराव अभिमानाने आपल्या मुलाचे शौर्य न्याहाळत होते.

सूं सूं करत एक बंदुकीची गोळी खंडेरावांच्या छातीत घुसली केव्हा आणि उन्मळलेल्या वृक्षाप्रमाणे खंडेराव घोड्यावरून खाली कसे पडले हे मल्हाररावांना कळलेच नाही. अहिल्येनेही आपल्या पतीचा मृत्यू पाहिला. अहिल्येच्या शोकाला पारावार उरला नाही. खंडेरावांच्या छातीवर डोके ठेवून ती रडू लागली. मल्हाररावांच्या शोकालाही पारावार उरला नाही.

"बाबा, मी सती जाणार आहे. माझ्या प्रयाणाची तयारी सुरू करायची आज्ञा द्यावी." अहिल्या मल्हाररावांना म्हणाली. वृद्ध मल्हारराव अंगावर वीज पडल्याप्रमाणे चमकले. आपला शोक आवरता घेत ते सुनेला म्हणाले, "अहिल्या, खंडेरावाच्या मृत्यूचे अपार दुःख कमी आहे म्हणून तू असे बोलतेस का ? मी तुला माझ्या मुलाप्रमाणे शिक्षण दिले ते उगाचच का ? या म्हाताऱ्याची काठी, डोळे, वारस सर्व काही तूच आहेस. तुला मी सती जाऊ देणार नाही. सारी होळकर प्रजा पोरकी होईल."

अहिल्येला मल्हाररावांचे म्हणणे पटले. तिने भावनेपेक्षा कर्तव्य श्रेष्ठ

मानले आणि सती जाण्याचा मनसुबा रद्द केला. अहिल्येने अलंकार, रंगीत वस्त्रांचा त्याग करून शुभ्र कपडे परिधान केले आणि मल्हाररावांच्या खांद्याला खांदा लावून तिने राज्यकारभाराची जबाबदारी स्वीकारली.

१७६६ साली राघोबादादा पेशव्यांनी पानिपतच्या पराभवाचे उट्टे काढण्याचा चंग बांधला होता. त्यांनी त्यासाठी मोहीम आखली, मल्हारराव होळकर, महादजी शिंदेंसारखे मातब्बर सरदार त्यांच्या मदतीला आले होते. दुर्दैवाने मल्हाररावांना ही मोहीम झेपली नाही. अलमपूरला ते आजारी पडले. आपण या आजारातून उठत नाही, हे त्यांनी ओळखले. महादजींना जवळ बोलवून ते म्हणाले, "माझा नातू मालेराव मोठा झाला आहे. त्याला माझ्या गादीवर बसवा आणि अहिल्येस त्याचा सल्लागार होऊ द्या. पेशव्यांच्या गादीला अंतर न देता....." मल्हाररावांचे प्राण अर्ध्यावरच उडाले.

त्यांच्या मृत्यूच्या बातमीने अहिल्येवर परत आभाळ कोसळले. त्यांच्या अखेरच्या क्षणी आपल्या हातून सेवा घडली नाही याचे तिला दु:ख झाले. त्यांच्या आज्ञेचे पालन करण्याचे तिने ठरवले. परंतु वाढत्या वयाबरोबर मालेरावची बुद्धी व समज ह्यात वाढ झाली नव्हती. राज्य करण्यास तो अपात्र आहे हे अहिल्याबाईने ताडले होते. त्यातच तो दुर्धर आजाराने बिछान्याला खिळला आणि अकाली मरण पावला.

अहिल्याबाईच्या आयुष्यावर मृत्यूची जणू अटळ कृष्णछाया पसरली होती. सारे मोह आणि पाश तोडून हिमालयात जावे असे तिला वाटू लागले. परंतु प्रजेच्या कल्याणासाठी तिला तेही करवेना. इंदोरला राहून तिने होळकरांची गादी आणि राज्याची सारी सूत्रे हाती घेतली. आपल्या प्रिय पुत्राच्या नावे तिने एक छत्री उभी केली.

उज्जैनीस राघोबादादा पेशव्यांचा मुक्काम होता. इंदूरच्या प्रतिष्ठित चंद्रचूड घराण्यातील गंगाधरपंतांचा दूत त्यांना भेटण्यास तेथे गेला. त्यांनी

पेशव्यांना निरोप दिला की अहिल्याबाई तिच्या मुलीस होळकरांच्या गादीवर बसविण्याच्या विचारात आहे. तिचा हा निर्णय धर्मबाह्य आहे. या संधीचा फायदा घेऊन पेशव्यांनी होळकरांची गादी खालसा करावी. हलक्या कानाच्या राघोबादादांना हा सल्ला पटला. अहिल्याबाईंच्या निष्ठेचा विश्वासघात आपण करत आहोत, याची दखल कोणीच घेतली नाही. पन्नास हजार पायदळ आणि बरोबर तोफखाना घेऊन ते इंदोरच्या दिशेने रवाना झाले.

इकडे अहिल्याबाईंनी आपल्या राज्याची सूत्रे हाती घेतल्याची जाहीर घोषणा केली. त्याच दिवशी त्यांच्या दरबारात एक खास दूत आला. "महाराणीजी, आपल्याशी खाजगीत आणि महत्त्वाचे बोलायचे आहे." त्याने अहिल्याबाईंना सांगितले. अंत:पुरात गेल्यावर चंद्रचूडांची दगाबाजी आणि राघोबादादांची इंदोरकडे होणारी आगेकूच त्याने अहिल्याबाईंच्या कानावर घातली. "छे ! चंद्रचूड होळकरांच्या गादीचे जुने आणि निष्ठावान सेवक आहेत. ते आमच्याशी दगाबाजी करणार नाहीत." पण गुप्तहेराने चंद्रचूडांनी राघोबादादांना पाठवलेला खलिताच अहिल्याबाईंच्या हाती दिला. अहिल्याबाई रागावल्या.

"आमचे राज्य खालसा करण्याचा किंवा त्याजर स्वारी करण्याचा राघोबादादांना अधिकार नाही." त्या उद्‌गारल्या. "ताबडतोब तुकाजींना आमच्यापुढे हजर करा." त्यांनी आज्ञा दिली.

अहिल्याबाईंनी मनात ओळखले होते की शक्तीपेक्षा युक्ती श्रेष्ठ असते. माधवराव पेशव्यांच्या शहाणपणावर आणि न्यायबुद्धीवर त्यांचा गाढ विश्वास होता. त्यांनी आपल्या सेनेला लढण्यासाठी सज्ज राहण्याचा आदेश दिला. त्याबरोबर माधवरावांना राघोबांचा डाव कळवला. माधवरावांनी त्यांना निरोप धाडला, "आमचे चुलते श्रीमंत राघोबा आपल्यावर अन्याय करू पाहत आहेत. आपण आपल्या स्वातंत्र्यासाठी

त्यांना लढा द्या. आमची आपल्याला पूर्ण अनुमती आहे."

क्षिप्रेच्या काठी राघोबांच्या सैन्याच्या छावण्या पडल्या होत्या. तुकोजी त्यांची तयारी पाहून डगमगले होते. परंतु अहिल्याबाई लढाईचा पोशाख चढवून, जातीने आपल्या सैन्याची, स्त्री सैनिकांच्या तुकडीची जमवाजमव करत होत्या. तुकोजींच्या माहितीमुळे त्या परत विचारात पडल्या. त्यांनी एक डाव टाकायचे ठरवले. राघोबांना त्यांनी खलिता धाडला, "आपल्या बलाढ्य सेनेपुढे माझा टिकाव लागला नाही तरी मला जग हसणार नाही. परंतु श्रीमंत पेशव्यांच्या सेनेला अहिल्याबाईच्या स्त्रीसेनेच्या हातून पराभव पत्करावा लागला तर फारच बेअब्रू होईल." राघोबा तसे भोळसर होते. ते विचारात पडले. माधवरावांची नापसंतीही त्यांच्या कानी आली होती. राघोबादादांनी आपला पवित्रा बदलला. त्यांनी अहिल्याबाईंच्या दूताबरोबर वेगळाच निरोप धाडला,

"महाराणी, आपला गैरसमज झाला आहे. आम्ही आपल्याशी युद्ध करण्याच्या हेतूने आलो नाही, तर आपल्या पुत्रनिधनाची बातमी ऐकून सांत्वन करण्यासाठी आलो आहोत." अहिल्याबाई हा निरोप वाचून हसल्या. आपल्या राज्यावरील गंडांतर टळल्यामुळे त्यांनी आई भवानीचे आभार मानले. केवळ चातुर्यावर त्यांनी हे संकट टाळले होते.

अहिल्याबाईंनी इंदोरहून महेश्वरला आपली राजधानी नेली. संस्कृत पाठशाळा, विणकलेस आर्थिक सहाय्य, मंदिरांचा जीर्णोद्धार, गरिबांचे रक्षण करून त्यांनी प्रजेचे प्रेम संपादन केले. अलीकडे प्रजाजन चोऱ्या, डाकू यांपासून त्रस्त झाले होते. त्यापासून कायमचा बंदोबस्त कसा करावा हे त्यांना कळेना. अखेर त्यांना युक्ती सुचली. त्यांनी साऱ्या राज्यात दवंडी पिटवली. जो तरुण हा उपद्रव थांबवेल त्याला आपल्या कन्येचा हात देण्याचे त्यांनी जाहीर केले.

यशवंतराव फणसे गरीब घरातील पण अतिशय धाडसी व शूर तरुण

होता. त्याने ही कामगिरी फत्ते केली आणि मुक्ता होळकरचा तो पती झाला. त्यानंतर होळकरांच्या राज्याच्या सीमेलगतचे चंद्रावत रजपूत अहिल्याबाईंना सतावू लागले. प्रजेला 'बाईच्या हाताखाली राबता!' म्हणून चिथवू लागले. अहिल्याबाईंनी त्यांना एकतीस गावे बक्षीस देऊन, त्यांचे तोंड गप्प करण्याचे ठरवले. परंतु काही महिन्यांनी चंद्रावत मोठी सेना घेऊन होळकरांवर स्वारी करून आले. अहिल्याबाईंनी घोड्यावर मांड ठोकली. आपल्या सैन्याचे नेतृत्व आपल्या हाती घेतले. त्यांचे सैन्य चंद्रावतांच्या सैन्याहून खूप कमी होते. तरीही प्राण पणाला लावून होळकरांचे सैन्य लढले आणि त्यांनी विजयश्री संपादन केली.

त्यानंतर अहिल्याबाईंनी अनेक वर्षे यशस्वीपणे राज्यकारभार केला. त्यांच्या शौर्य आणि चातुर्याइतक्याच त्यांच्या दानशूरतेबाबत त्यांनी ख्याती मिळवली आणि भारतीय इतिहासात आपले नाव अमर केले.

ग्र. पु. सं. ग्रंथ, अमलनेर जिल्हा
मराठी वाङ्मय मंडळ
ग्र. क्र. २३५.१० दिनांक २३.१.८७
विषय
ले. ध्र. क्र.

चाँदबिबि



इ. स. १५९५ नंतर महाराष्ट्राचे अनेक तुकडे पडले होते. अनेक छोटी छोटी राज्ये महाराष्ट्रात निर्माण झालेली होती. अहमदनगर हे त्यांतीलच एक राज्य होते. राज्यसत्ता आणि त्यामुळे प्राप्त होणाऱ्या अधिकारामुळे अहमदनगर राज्यात सत्तेसाठी कलह सुरू झाला होता. बुऱ्हन्-उल-मुल्क नावाच्या मुसलमानाने राजा अकबराच्या मदतीने अहमदनगरची गादी काबीज केलेली होती. एकदा गादी मिळाल्यावर बुरहनचे राज्यकारभारावरील लक्ष उडाले होते. ऐषाराम आणि चैनीत त्याचे सारे आयुष्य वाया जात होते. अति व्यसनापायी त्याला अकाली मृत्यू आला आणि त्याच्या राज्यात परत सत्तेसाठी भांडणे सुरू झाली. याच दरम्यान चाँदबिबीसारखी महान वीर तारका भारताच्या इतिहासाच्या क्षितिजावर तळपू लागली.

बुरहन्-उल-मुल्कची चाँदबिबी बहीण होती. विजापूरच्या अलि-अदील शहाची ती पत्नी होती. पतीच्या अकाली निधनामुळे तरणीताठ चाँद अहमदनगरला आपल्या भावाकडे परतली होती. त्याच्या मृत्यूनंतर राज्यात गादीसाठी दंगेधोपे सुरू झाले होते. चाँद-बिबी अतिशय हुषार आणि धोरणी होती. तिने ओळखले की या दुफळीचा फायदा मुगल घेतील आणि राज्य काबीज करतील, आणि साऱ्यांना योग्य मार्गदर्शन करण्याच्या हेतूने तिने राजपुत्र बहादूरच्या वतीने राज्यकारभाराची सूत्रे आपल्या हाती घेतली आणि तिने स्त्री पुरुषांएवढ्या मुत्सद्दीपणे

राज्यकारभार चालवू शकते, हे सिद्ध करून दाखवले होते.

चाँदबिबी घोडदौड, तलवारबाजी, तिरंदाजी आदी युद्धकलांमध्ये अतिशय निपुण होती. मी मी म्हणणारे योद्धेदेखील तिच्या पराक्रमी वर्तनामुळे थक्क होत होते. चाँदबिबीचा भाऊ जिवंत असतानाच त्याच्या मृत्यूनंतर राज्यात दंगधोपे माजणार याचे भाकित आधीच अनेकांनी केलेले होते. बुरहन्च्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा इब्राहीम याला गादी मिळाली होती. त्याने गादीवर आल्या आल्या आपल्या ईस्माइल या भावाचे डोळे काढून टाकून, त्याला मारले होते. आपली सत्ता त्याच्या हाती जाऊ नये, यासाठी हे कुटील कारस्थान त्याने रचले होते खरे ! पण त्यानंतर काही दिवसांतच रणांगणावर तो स्वतःच मारला गेला होता. राहता राहिला होता लहानगा बहादूर ! चाँदबिबीला स्वतःचे मूल नव्हते. तिने त्याच्यावतीने राज्याची सूत्रे हाती घेतली. सुरुवातीला एका स्त्रीच्या आधिपत्याखाली, तिच्या हुकुमांप्रमाणे वागणे, अनेक नागरिकांना पसंत नव्हते. अनेक मातब्बर सरदारांनी तिचे महत्त्व उघडपणे नाकारण्यास सुरुवात केली. तरीही चाँदबिबी डगमगली नाही. "मी लोकांसाठी राज्य करणार आहे. मला सरदारांची पर्वा नाही." असे तिने जाहीर केले. परंतु त्यामुळे परत राज्यात बंडाळी आणि अराजकता माजू लागली. एक स्त्री राज्यकारभार यशस्वीपणे करू शकणार नाही, असे त्या साऱ्यांना वाटत होते. मिया मंझु नावाच्या एका सरदाराने अकबरला पत्र पाठवून मदतीची याचना केली.

राजा अकबराला नेमके हेच हवे होते. दख्खनच्या राजकारणात हस्तक्षेप करून, अधिकाधिक प्रदेश काबीज करण्याची त्याची इच्छा होतीच ! त्यामुळे अहमदनगरच्या सरदारांच्या मदतीचे बोलावणे आल्यावर, त्याने त्वरित आपल्या मुराद नावाच्या मुलाबरोबर भलामोठा फौजफाटा पाठवला. मुरादच्या कर्तबगारीवर अकबराचा फारसा विश्वास

नव्हता. म्हणून आपल्या सेनापतीलाही त्याने बरोबर पाठवले होते. मुराद व त्याच्यातील मतभेदामुळे त्यांचा वेग थोडा कमी पडत होता.

त्यांची प्रचंड सेना, हत्यारे पाहून सारे थक्क होत होते. चाँदबिबीचा आपल्या सैनिकांच्या पराक्रमावर विश्वास होता. पण त्यांची संख्या कमी पडणार होती. परंतु ऐनवेळेस मिया मंझुचे विचार बदलले. त्याने बहादुरची बाजू घेण्याचे ठरवले. चाँदबिबीलाही बरे वाटले. कारण मिया मंझूच्या बाजूला विजापूर, गोवळकोंड्याचे सरदार होते. चाँदबीबीने मिया मंझुशी समझोता केला. त्याला विजापूर आणि गोवळकोंड्याच्या दरबारात आपला प्रतिनिधी नेमले. आता चाँदबिबीला आंतरिक शत्रू राहिले नव्हते. फक्त मोगलांचे भय तिला उरले होते.

अखेर मुगलांचे सैन्य अहमदनगरपाशी येऊन पोचले. घनघोर लढाईला प्रारंभ झाला. मुगलांच्या सैन्याने अहमदनगरच्या किल्ल्यास वेढा घालण्याचे ठरवले. परंतु त्यांचा हा प्रयत्न पूर्णतः यशस्वी होऊ शकला नाही. कारण किल्ल्यातून एक तुकडी बाहेर पडली आणि मुगलांची फळी तोडण्याचा प्रयत्न करू लागली. गोवळकोंडा आणि विजापूरचे सैन्यही चाँदबिबीच्या मदतीला येत आहे ही बातमी तिला कळली.

चाँदबिबीने आपल्या सेनापतींना धोक्याचा इशारा दिला. "ही बातमी शत्रुगोटापर्यंत पोचू देऊ नका. सतत त्यांच्यावर लक्ष ठेवा. कदाचित, आपल्याला कुमक मिळत आहे हे पाहून त्यांचा युद्धाचा पवित्राही बदलेल." तिची ही मुत्सदेगिरी वाखाणण्यासारखी होती. परंतु मुरादला ही खबर मिळून चुकली होती. अहमदनगरच्या सैन्याचा पाडाव करून आपण बाकी दोन्ही राज्यांच्या सैन्याचा सहज निःपात करू असे त्याला वाटत होते. दारूगोळ्याने नगरचा किल्लाच उडवून देण्याचे त्याने ठरवले. मुगलांच्या खास आणि शूर सैनिकांनी भराभर सुरुंग लावण्यास सुरुवात केली. पाच सुरुंग थेट किल्ल्यापर्यंत नेऊन भिडवले गेले. चाँदबिबीच्या खास

गुप्तहेरांनी त्वरित ही बातमी तिच्यापर्यंत नेऊन पोचवली. सर्वजण हतबल झाले. परंतु चाँदबिबी झाली नाही. "हे पहा, घाबरून आणि खचून जाण्याचे काहीही कारण नाही. यातूनही मार्ग निघू शकतो. आपण हे सुरुंग हुडकून काढू या. त्यातील दारुगोळा काढून टाकला की झाले. म्हणजे मुगलांनी सुरुंग पेटवले तरी ते उडणार नाहीत. पण एक लक्षात घ्या– ते सुरुंग दारूची पूड काढतानाच फुटण्याची शक्यता आहे. तुमचे प्राणही गमवावे लागतील."

परंतु चाँदबिबीच्या धाडसाचे लोण तिच्या शूर सैनिकांपर्यंत पोचले होते. आपल्या देशाच्या रक्षणासाठी प्राणांची आहुती देण्यास खूपजण पुढे आले. सारी रात्र लपून, छपून सुरुंग शोधण्याचे काम सुरू झाले. मुगलांचे पहारेकरी गाफिल राहिले होते. रात्री त्यांनी खुशाल ताणून दिली होती. त्यामुळे चाँदबिबीच्या सैनिकांचे काम सोपे झाले होते. पहाट झाल्यावर एक मुगल पहारेकरी जागा झाला. त्याच्या लक्षात सारा प्रकार आला. त्याने धावत-पळत मुगलांच्या छावणीत जाऊन ही खबर दिली. "ताबडतोब सुरुंगांना बत्ती लावा." मुरादने आज्ञा दिली. एक सुरुंग उडाला आणि किल्ल्याच्या एक तटाला पाहता पाहता मोठे भगदाड पडले. मुगलांनी आपला सारा फौजफाटा तेथून आत घुसवण्याचे ठरवले.

परंतु चाँदबिबीसुद्धा कच्ची युद्धपटू नव्हती. हत्तीवर बसून तिने जातीने हे खिंडार बुजवण्याचे काम सुरू केले. ती कुशल कामगारांना एकीकडे सूचना देत होती, तर दुसरीकडे आपल्या सैन्याला धीर देत होती. "आपल्या तटाला खिंडार पडले तरी किल्ला तर आपल्याच ताब्यात आहे ना ? तेव्हा अजिबात घाबरायचे नाही. धीर सोडायचा नाही. आपण प्रयत्न करून हे खिंडार बुजवू या. शत्रूला धडा शिकवू या." पाहता पाहता खिंडार बुजत आले. मुगलांना याचा पत्ताच नव्हता, असे नाही, पण इतक्या झटपट हे काम पूर्ण होईल, असे त्यांना वाटले नव्हते. ते गाफील राहिले होते.

चाँदबिबीची कुमकही येऊन दाखल झाली होती. परत एकदा घनघोर लढाई सुरू झाली. परस्परावर तोफगोळे, बंदुकीच्या फैरी झाडण्यास सुरुवात झाली. मुराद स्वतः घोड्यावर स्वार होऊन आपल्या सैनिकांना धीर देत होता. मुगलांचे सैन्य प्रबळ असूनही त्यांचे खूप नुकसान होत होते. सारा दिवस लढाई चालू होती. चाँदबिबीच्या शूर सैन्याने प्राण पणाला लावून किल्ल्याचे संरक्षण केले. रात्र पडली. अजूनही खिंडार पुरते बुजले नव्हते. चाँदबिबीने ठरवले की, जोपर्यंत हे काम पूर्ण होत नाही, तोपर्यंत विश्रांती घेणे व्यर्थ आहे. किल्ल्यातील साऱ्या स्त्रियादेखील चाँदबिबीच्या कर्तबागारीमुळे थक्क झाल्या होत्या. बुजत जाणाऱ्या खिंडाराबरोबर चाँदबिबीच्या प्रजेत असणारी दुफळीही मिटत चालली होती.

चाँदबिबीने दुसऱ्या दिवशी परत आपल्या कार्याला प्रारंभ केला. तिच्या सैन्याच्या अन्नधान्य आणि दारुगोळ्याचा तिच्यापुढे प्रश्न होता. अजूनही गोवळकोंडा आणि विजापूरकडून कुमक आलेली नव्हती. त्यावर कड म्हणजे चाँदबिबीची वाढती लोकप्रियता सहन न झाल्याने, काही देशद्रोह्यांनी तिच्या खुनाचा कट रचला होता. तिच्या विश्वासू सरदारांनी तिला ही बातमी दिली. परंतु देशहितापुढे तिला प्राणांचीही पर्वा नव्हती.

इकडे मोगलांचाही धीर खचत चालला होता. त्यांची कुमक संपत आली होती. त्यांची मनुष्यहानीही पुष्कळ झालेली होती. शेवटी मुरादने चाँदबिबीबरोबर वाटाघाटी करण्याची तयारी दर्शवली. चाँदबिबीचा विश्वासू सेवक मुर्ताझा या कामासाठी मुरादला भेटण्यास गेला. मुगल सैन्य मागे घेऊन युद्ध-विराम घेण्याची तयारी मुरादने दाखवली. त्याचप्रमाणे बहादूरला राजा म्हणून मान्यता देण्याचीही तयारी दर्शवली. त्याबदल्यात चाँदबिबीकडून मोठ्या नजराण्यांची आणि बेरारची मागणी केली. दोन्ही बाजूंनी मागण्या मान्य होऊन तह झाला.

यानंतरही चाँदबिबीची कारकीर्द अतिशय कर्तबगार झाली. तिने

आपल्या राज्यातील अंतर्गत बंडाळी तर मोडलीच ! परंतु मुगलांसारख्या बलाढ्य शत्रूलाही नमवले होते. अनेक हितचिंतक जमा करून तिने आपली कारकीर्द गाजवली होती. हे सारे करत असताना तिने असीम धैर्य, चातुर्य, मुत्सद्देगिरी दाखवली होती. एका तरुण, विधवा स्त्रीने केलेली ही कामगिरी अजोड आहे. म्हणूनच भारताच्या इतिहासात चाँदबिबीचे नाव मोठ्या गौरवाने लिहिले गेलेले आहे. तिचे उदाहरण आजही आपण घेण्यासारखे आहे.


म. सं. ग्रं. डॉट, जालमालक्षा जालना.
वास वाङ्मय संग्रह
वा. क्र. २.५.५.0 दिनांक २२।६।५७
शिक्षण संस्था ... क्र. ... ...

झाशीची राणी

दुसऱ्या बाजीराव पेशव्यांचे एक सेवक मोरोपंत म्हणून होते. त्यांच्या सेवेसाठी मोरोपंत बिठूरला राहत होते. मोरोपंतांना मनकर्णिका नावाची मुलगी होती. तिला प्रेमाने सर्वजण मनू म्हणत. मनूला तिच्या बरोबरीच्या मुलांबरोबर खेळायला आवडे. पण त्यापेक्षाही तिला लिहिणे, वाचणे आवडे. त्या काळी स्त्रियांनी शिकणे ही बाब अतिशय दुर्मिळ होती.

पाहता पाहता मनू अकरा वर्षांची झाली. त्या काळी मुलींचा विवाह त्यांच्या बालपणीच होत असे. मोरोपंतांची पत्नी मनूच्या विवाहाच्या काळजीत पडलेली होती. मोरोपंतांनी मनूची कुंडली मोठमोठ्या ज्योतिषांना दाखवलेली होती. तिच्या विवाहाचा राजयोग त्यात दिलेला होता. आणि हे भविष्य खरे ठरण्याचा योग आला. झाशीच्या महाराजांनी तिला मागणी घातली. मनूची लक्ष्मी होऊन ती सासरी आली. १८४२ साली मे महिन्यात हा विधी संपन्न झालेला होता.

१८५१ साली लक्ष्मीने पुत्ररत्नाला जन्म दिला. परंतु त्यामुळे पसरलेला आनंद अधिक काळ टिकणारा नव्हता. कारण एक महिन्याच्या अवधीतच तिला पुत्रवियोग सहन करावा लागला होता. इकडे पुत्राच्या मृत्यूमुळे झाशीच्या महाराजांनी हाय खाल्ली. त्यांची प्रकृती अतिशय खालावत चालली होती. आपल्याला परत मुलगा– गादीला वारस मिळणार की नाही, याबाबत ते साशंक होते. मृत्यू तर त्यांच्या दारातच घोटाळत होता.

अखेर त्यांनी पुत्र दत्तक घेण्याचे ठरवले. १८५३, १९ नोव्हेंबरला त्यांनी दत्तक विधी मोठ्या थाटामाटाने केला. त्यानंतर एका दिवसातच ते निधन पावले.

साऱ्या झाशीवर दुःखाची छाया पसरली. तरुण लक्ष्मीबाईवर तर आभाळच कोसळले. साऱ्या झाशीकरांची जबाबदारी आपल्यावर आहे, हे तिने ताडले. तिने आपले दुःख बाजूला सारून, साऱ्या राज्याचा कारभार आपल्या हाती घेतला. अत्यंत न्याय्य आणि सुज्ञपणाने तिने राज्य चालविण्यास प्रारंभ केलेला होता.

ब्रिटिश गव्हर्नर-जनरलला तिने एक खास खलिता धाडला. आपल्या दत्तक पुत्राला झाशीचा राजा म्हणून मान्यता मिळावी, अशी तिने त्यात मागणीही केलेली होती. परंतु ब्रिटिशांनी तिची ही मागणी धुडकावून लावली आणि झाशीवर आपला झेंडा फडकवण्याचे ठरवले.

राणी लक्ष्मीबाईला ब्रिटिशांचा मनसुबा कळला. ती अतिशय चिडली. तिने कोणत्याही परिस्थितीमध्ये आपण हे घडू देणार नाही असे ब्रिटिशांना कळवले. आपली फिर्याद तिने थेड लंडनपर्यंत पोचविण्याचे ठरवले. तिच्या प्रजाजनांचा तिला पूर्ण पाठिंबा लाभलेला होता. परंतु लंडनच्या कामगिरीतही अपयशच आले. ब्रिटिशांचा हा जुलूम आणि लबाडी आपण खपवून न घेता, त्यांना टक्कर द्यायचा तिने निश्चय केलेला होता.

इकडे ब्रिटिशांनी छोटी छोटी संस्थाने खालसा करून, त्यांवर आपला हक्क शाबीत करण्याची जणू मोहीमच उघडलेली होती. ब्रिटिशांनी त्यांच्या कारखान्यात बनलेला माल, भारतीय बाजारपेठांमध्ये विक्रीस आणला होता. त्यामुळे भारतीय कामगार आणि कारागीर बेकार होऊ लागले. ब्रिटिशांनी हिंदूंना बाटवण्यासही सुरुवात केलेली होती. या सर्व कारणांमुळे भारतीयांच्या मनात असंतोषाचा अग्नी धुमसू लागलेला होता.

१८५० साली काही देशभक्त भारतीयांनी ब्रिटिशांविरुद्ध बंडाचा झेंडा फडकवला. मीरतला एका पलटणीने आपल्या ब्रिटिश अधिकाऱ्याला गोळी घालून ठार केले आणि बंडाची तुतारी फुंकली. दिल्लीला या पलटणीचे जोरदार स्वागत झाले. दिल्लीला या पलटणीने मुगल तख्तावर परत बादशहाला बसवले आणि तेथूनच आपल्या स्वातंत्र्यलढ्याची सूत्रे हलविण्यास सुरुवात केली.

कानपूर, लखनौ, सीतापूर, अशा संस्थानांत बंडाची निशाणे हळूहळू फडकू लागली. त्याचे लोण अखेर झांशीपर्यंत येऊन ठेपलेच ! ब्रिटिश लोक अतिशय लबाड आणि वारा पाहून दिशा बदलणारे होते. स्वातंत्र्यसैनिक जेव्हा आपल्याच रोखाने निघालेले आहेत, हे त्यांनी पाहिले, तेव्हा त्यांनी राणी लक्ष्मीकडे मदतीची याचना केली. आपल्याला मदत नाकारणारे, आपली विनंती धुडकावणारे इंग्रज आपल्यालाच मदत मागत आहेत, हे पाहून राणी चिडली. त्यांनी या वेळेस तिच्या दत्तक पुत्राला मान्यता देण्याचीही संमती दर्शवली होती. परंतु लक्ष्मीबाई स्वाभिमानी आणि देशभक्त होती. तिने इंग्रजांची विनंती धुडकावून लावली. स्वातंत्र्यसैनिकांपुढे ब्रिटिशांचा अजिबात टिकाव लागला नव्हता.

त्यानंतर साऱ्यांनी एकमुखाने लक्ष्मीबाईला आपली राणी आणि राज्यकर्ती म्हणून मान्यता दिली. तिच्या प्रजाजनांचा तिच्यावर पूर्ण विश्वास आणि श्रद्धा होती. राणी लक्ष्मीने राज्यात परत एकदा सुव्यवस्था प्रस्थापित केली. राज्याच्या वाचनालयात तिने अनेक मौलिक ग्रंथांची भर टाकण्यास सुरुवात केली. ती तेवढीच कलाप्रेमीही होती.

परंतु राणी लक्ष्मीने दुर्दैव सदाशिव या तिच्या दूरच्या भाच्याच्या रूपाने आड आले. झाशीच्या गादीवर आपलाच हक्क आहे, हे तो सर्वांना सांगू लागला. त्यानी बराच फौजफाटाही जमा केलेला होता. राणी लक्ष्मीला अखेर त्याच्याशी युद्ध करून, त्याचा पाडाव करावा लागला. देव जणू

तिची सत्वपरीक्षा पाहत होता. अशी एकामागे एक संकटे तिच्यावर तो आणत होता.

त्यानंतर शेजारच्या दोन संस्थानांतील राजांना झाशीची हाव सुटली. त्यांना वाटले, एका विधवा आणि तरुण स्त्रीचे राज्य हिसकावून घेणे अजिबात अवघड काम नाही. त्यांचे सैन्य झाशीवर चाल करून आले. राणीने आपल्या सैन्याला तयार राहण्याचा आदेश दिला. परंतु शत्रुसैन्य जवळ आल्याखेरीज त्यांच्यावर हल्ला चढवायचा नाही, असे तिने ठरवलेले होते. कारण हकनाक तिच्या सैन्याची होणारी हानी तिला टाळायची होती. शत्रुपक्षाला वाटले की राणी युद्ध करण्यास घाबरत आहे. त्यासाठी तिची तयारीच झालेली नाही. त्यामुळे निर्वेधपणे हे सैन्य पुढे येऊ लागले. ते खूप जवळ आल्यावर चारी बाजूंनी झांशीच्या सैनिकांनी त्यांच्यावर दारुगोळ्यांचा वर्षाव सुरू केला. तात्पुरती तरी शत्रुपक्षाची दाणादाण उडाली. परंतु हे राजेही कच्च्या गुरूचे चेले नव्हते. त्यांनी तोफा लपवून आणलेल्या होत्या. रात्र पडताच त्यांनी गोळेफेक सुरू केली.

बेसावध अशा झाशीच्या सैन्याची पळापळ झाली. त्यांचा धीर खचू लागला. परंतु राणी लक्ष्मी म्हणजे धैर्याचा मेरुमणी होती. घोड्यावर मांड ठोकून, हातात तलवार घेऊन ती आपल्या सैन्यात हिंडत होती.. त्यांचा खचलेला धीर त्यांना परत देण्याचा तिचा प्रयत्न चाललेला होता. तिने महाप्रयत्न करून विजयश्री आपल्याकडे जणू खेचून आणली होती. राणीने आपल्या पराक्रमी सैन्याचा सत्कार करून विजयोत्सव साजरा केला.

परंतु राणीचा हा आनंद चिरकाल टिकणारा नव्हता. कारण दिल्लीचे तख्त परत ब्रिटिशांनी काबीज केल्याचे तिला कळलेले होते. नानासाहेबांचा पराभव करून, ब्रिटिशांनी कानपूरवरही परत आपले बस्तान बसवलेले होते. औंधही ब्रिटिशांनी बळकावले. तेव्हा राणी सावध

झाली. ब्रिटिशांना तोंड देण्याची जय्यत तयारी तिने सुरू केली. तिने जातीने लक्ष घालून, सैन्याची शिस्त आणि तालीम वाढवली. नवी शस्त्रे, दारूगोळा जमवण्यासही तिने प्रारंभ केला. तिने सैन्यात नव्या जोमाच्या तरुणांची भरती करण्यासही सुरुवात केली. एवढंच नव्हे, तर झाशीतील स्त्रियांना तिने एकत्र केले. त्यांना तिने लढाईचे शिक्षण देण्यास सुरुवात केली. त्यांना घोडदौड, नेमबाजी, शुश्रूषा, शत्रूच्या हालचालींवर नजर ठेवणे अशी अनेक कामे तिने शिकवली. स्त्रियांना एकत्र आणून त्यांना नवी दृष्टी देण्यासाठी तिने एक खास हळदी-कुंकवाचा सोहळा घडवून आणला. त्यासाठी जमलेल्या स्त्रियांना तिने लढाई का होणार; त्यासाठी स्त्रियांचा काय कार्यभाग असणार, हे सर्व समजावले.

चंदेरीचा किल्ला ब्रिटिशांनी जिंकला. झाशी त्यांच्या आता अगदी जवळ आलेली होती. परंतु राणी लक्ष्मीचे जाज्वल्य देशप्रेम आणि पराक्रम यांची ब्रिटिशांना पुरती ओळख होती. तिने आपले जुने विश्वासू मित्र तात्या टोपे आणि रावसाहेब पेशव्यांकडे मदत मागितली होती. तात्या टोप्यांनी राणीला आपली बहीण मानलेले होते. ब्रिटिशांना फितुर असलेल्या पन्नाच्या राजावर आणि चरखारीच्या राजावर टोप्यांनी स्वारी केलेलीच होती. दाती तृण धरून त्यांना शरण यावे लागले होते.

राणी लक्ष्मीने आपल्या सर्व सरदारांना आणि विश्वासू लोकांना एकत्र बोलावले आणि ब्रिटिशांशी मुकाबला करायचा का त्यांच्याशी तह करायचा, असे विचारले. सर्वांनी ब्रिटिशांशी लढण्याची तयारी दर्शवली. राणीने सर्वांना हमी दिली की, "आपण जर यात जिंकलो तर आपण भाग्यवानच ठरणार ! हरलो, तर देशासाठी प्राण पणाला लावून देशासाठी लढल्याचे पुण्य मिळेल." एक स्त्री असूनही तिचे हे विचार अत्यंत निधड्या छातीच्या पुरुषाला लाजवणारे होते.

२५ मार्च, १८५८ साली इंग्रजांनी आपल्या तोफा झाशीवर डागल्या.

झाशीच्या शूर-वीरांनी त्यांना तेवढ्याच तडफेने उत्तर देण्यास सुरुवात केली. पाच दिवस घनघोर युद्ध चालले होते. ब्रिटिशांची डाळ झाशीवीरांपुढे शिजत नव्हती. तेवढ्यात तात्या टोपे कुमक घेऊन राणी लक्ष्मीच्या मदतीला धावून आले. इंग्रजांनी अधिक तोफा डागल्या. आणि टोप्यांच्या सैन्यावर तोफगोळ्यांचा पाऊस पाडण्यास सुरुवात केली. टोप्यांचे सैन्य घाबरून, इतस्ततः पांगले.

राणी लक्ष्मीच्या लक्षात आले की प्रसंग बाका होता. तिच्या सैन्याचं मनोधैर्य खचण्याची वेळ आलेली होती. राणी लक्ष्मीने आपल्या सैन्याला धीर देण्यास सुरुवात केली. आपल्या अधिकाऱ्यांना तिने युद्ध चालू ठेवण्यास सांगितले. परंतु ३ एप्रिल १८५८ची रात्र राणीच्या दृष्टीने अतिशय दुर्दैवी ठरली. तिच्या सैन्यातील एक सैनिक फितुर झाला होता. त्याने किल्ल्याची चोरवाट इंग्रजांना दाखवली आणि त्यांना आत घेतले.

राणीच्या निष्ठावान सैनिकांच्या लक्षात ही फितुरी आली. त्यांनी त्वरित राणीला उठवून, सर्व खबर दिली. राणीने साऱ्या परिस्थितीचे अवलोकन केले. तिलाही निराशा घेरू पाहत होती. क्षणभर शरण येण्याचा विचार तिच्या मनात तरळून गेला. परंतु राणी लक्ष्मीचा जाज्वल्य देशाभिमान अधिक जागृक होता. ती आपल्या खास साथीदारांसह इंग्रजांवर तुटून पडली. इंग्रजांना हा हल्ला अनपेक्षित होता. एखाद्या विजेच्या चपळाने राणीची तलवार फिरत होती. ब्रिटीश सैन्याला पळता पळता नाकी नऊ आले. परंतु त्यांचा हा पराभव क्षणैक होता.

राणीने शरण न जाता काल्पीला जाण्याचे ठरवले. तिला लढता, लढता मरण आलेले चालणार होते. राणीने अंगावर युद्धाचा पोशाख आणि चिलखत चढवले. पाठीला दत्तक पुत्राला बांधले. आपल्या काही विश्वासू साथीदारांबरोबर ती रातोरात काल्पीला निघाली. ब्रिटिशांना त्याचा पत्ता खूप उशिरा लागला. राणीने तिला पकडण्यास आलेल्या दोन

इंग्रजांना यमसदनाला पाठवले होते. चिडलेल्या इंग्रजांनी झाशीत विध्वंसाचे पर्व सुरू केले.

राणी लक्ष्मी मजल दरमजल करत काल्पीला– रावसाहेबांच्या तळावर पोहोचली. रावसाहेबांनी तिचे स्वागत केले. राणीने रावसाहेबांना स्वातंत्र्यसंग्रामात मदत करण्याचे ठरवले. परंतु तिच्या युद्धविषयक सल्ल्याला रावसाहेबांनी महत्त्व दिले नाही. त्यामुळे व्हायचे तेच झाले. इंग्रजांच्या हल्ल्यापुढे त्यांच्या सैन्याचा टिकाव लागला नव्हता. रावसाहेब हताश झाले. त्यांनी इंग्रजांना शरण जाण्याचे ठरवले. परंतु राणीने त्यास विरोध केला. बंडाचा नवाब त्यांच्या मदतीला मोठी कुमक घेऊन आलेला होता. तिने सल्ला दिला, "रावसाहेब, शत्रूला घाबरून शरण येण्याचा भ्याडपणा आपण करू नये. आपण शेवटपर्यंत त्यांना टक्कर दिली पाहिजे. त्यांच्याकडे खूप आधुनिक हत्यारे आणि शिस्तबद्ध सैन्य आहे. तरी देखील आपला दृढनिश्चय आणि राष्ट्रनिष्ठा त्याला पुरून उरणारी आहे."

राणी रणांगणावर वाघिणीप्रमाणे शत्रूवर तुटून पडत असे. तिच्यामुळे अनेकांना स्फुरण चढत असे. तिने सैन्याला धीर देण्यास सुरुवात केली. ब्रिटीश जनरल सर रोज त्या वेळेस ब्रिटिशांचे सेनापती होते. त्यांनी आपली राखीव उंटांची फौज बाहेर काढण्याचे ठरवले. पेशव्यांच्या सैन्याला हा हल्ला पुरता उद्ध्वस्त करून गेला. साऱ्या सैन्याची पांगापांग झाली. विजय त्यांच्यापासून दूर गेला.

सारे भारतीय सेनानी खास सल्लामसलतीसाठी एकत्र झाले. ग्वाल्हेरच्याकडे कूच करण्याचे त्यांनी ठरवले. ग्वाल्हेरच्या महाराजांकडून मदत मागण्याचे ठरवले. राणी लक्ष्मीबाईमुळे ग्वाल्हेरची मोहीम पेशव्यांनी सफल केली. पेशव्यांनी तेथील गादी घेतली. आणि त्यानिमित्त मोठा सोहळा सुरू केला. राणी या प्रकारामुळे अतिशय अस्वस्थ झाली. तिला

समारंभात एवढा पैसा खर्च करणे पसंत नव्हते "इंग्रजांच्या पुढच्या हल्ल्याला तोंड देण्याची तयारी करण्याऐवजी आपण हे काय आरंभले आहे ?" तिने रावसाहेबांना विचारले.

परंतु रावसाहेब थोड्याशा यशामुळे गाफील बनले होते. शेवटी व्हायचे तेच झाले. ग्वाल्हेरवर इंग्रजांनी हल्ला चढवला. राणीने पुरुषांच्या लढाईचा पोशाख चढवला. आणि ती इंग्रजांवर तुटून पडली. घनघोर लढाई झाली. ब्रिटिशांना अधिक कुमक मिळाली. तरीही राणीने धीर सोडला नव्हता. परंतु लढता लढता ती घायाळ झाली. तिला इतरांनी सुरक्षित जागी हलवले. परंतु राणी लक्ष्मीचे प्राण लगेचच उडाले. मारता मरताही तिने स्वातंत्र्यलढा चालू ठेवण्याचा उपदेश दिला.

"मेरी झाँशी नही दूँगी।" या आपल्या बाणेदार उत्तराने राणी लक्ष्मीबाईने इंग्रजांविरुद्ध बंडाची आघाडी उघडली होती. शेवटपर्यंत ती आपल्या निश्चयापासून ढळली नव्हती. प्राण पणाला लावून तिने देशप्रेम दाखवलेले होते. धन्य हो ती महान स्त्री ! अशी वीरांगना भारतीय नारींचे भूषण आहे.

कित्तूरची चन्नम्मा



धुलप्पा गौंडांच्या चन्नमाचा विवाह, कित्तूरच्या राजाबरोबर मोठ्या थाटामाटाने झाला. चेन्ना आणि राजा मल्लसारजा विवाहानंतर कित्तूरला रवाना झाले. कित्तूरचा राजा त्याच्या पराक्रमासाठी आणि वीरतेसाठी साऱ्या भारतात प्रसिद्ध होता. आपली नवविवाहित, द्वितीय पत्नी, आपल्यापेक्षा वयाने खूप लहान आहे म्हणजे आपण तिच्यावर अन्याय तर केला नाही ना, असे त्यांना वाटत होते.

आपल्या पतीच्या मनाची अवस्था चेन्नाने ओळखली. ती म्हणाली, "महाराज, आपल्याशी विवाह झाल्याने मी धन्य झाले आहे. आपल्या पराक्रमाच्या आणि देशप्रेमाच्या कथा मी ऐकलेल्या आहेत. बाबांनी मला त्या सांगितल्या होत्या. तुम्ही टिपू सुलतानाच्या तुरुंगातून कसे सुटलात, वेष पालटून कित्तूरला कसे परतलात, हे मला ठाऊक आहे. तुम्ही अस्वस्थ होऊ नका."

कित्तूरला महाराजांच्या पहिल्या पत्नीने– राणी रुद्रम्माने नव्या नवरीचे प्रेमाने स्वागत केले. तिला शिवलिंग रुद्र नावाचा मुलगा होता. सारेजण त्याला प्रेमाने शिवा म्हणत. शिवाही चन्नाराणीला येऊन बिलगला. शिवा आणि चन्नांचा एकमेकांना लळा लागला. चन्नाराणी आपल्या सावत्र मुलाला अतिशय प्रेमाने वागवे. तलवारबाजी, घोडदौड यांसारख्या युद्धकलांचे शिक्षण चन्ना त्याला जातीने देई. त्यामुळे मोठी राणी आणि राजा चन्नावर प्रसन्न होते.

कालांतराने राणी चन्नालाही मुलगा झाला. त्याचे नाव होते बसवराज ! दोन्ही राजपुत्र बघता बघता वयात आले. शिवा आणि बसवराजांवर तिचे सारखेच प्रेम होते. बसवराजही आईच्या तालमीत तयार झाला. राजाने आपल्या दोन्ही राजपुत्रांचा विवाह करण्याचे ठरवले. दोन्ही विवाह खूप थाटामाटात साजरे झाले. त्यानंतर पाच वर्षे बसवराजाने संसार केला. परंतु एक दिवस ऐन तारुण्यात काळाने त्याला ओढून नेले. चन्नाराणीवर जणू आभाळच कोसळले. ती अबोल झाली. दिवस-रात्र ती दुःखात चूर असे. राजाला तिची ही दशा पाहवेना. एक दिवस तो तिला म्हणाला, "राणी , एक पुत्र गेला म्हणून तू एवढे दुःख करत आहेस. पण तुझ्या इतर पुत्रांकडे कोण पाहणार ?" राणीला आपले बाकीचे पुत्र कोण हे कळेना. अखेर राजाने तिला राज्यकारभारात लक्ष घालण्यास सांगितले. सारे प्रजाजन हे तिच्या मुलांप्रमाणेच आहेत, हेही तिला सांगितले.

त्या दिवशी राणी चन्नमाचा जणू नवा जन्म झाला. आपले दुःख विसरून ती राज्यकारभारात रस घेऊ लागली. जातीने न्याय-निवाडा करू लागली. कर्नाटकातील कित्तूर राज्य तसे लहानच होते. तरी देखील ती साऱ्या राज्यात स्वतः हिंडे. धर्माचा भेदभाव न मानता, सर्वांना मदत करे. धार्मिक संस्थांना तिने मोठ्या देणग्या दिल्या. त्यामुळे चेन्ना राणी साऱ्या प्रजाजनांमध्ये लोकप्रिय झाली.

इदूर गावी पेशव्यांचा मुक्काम होता. त्यांनी राजा मल्लसारजाला तेथे बोलावून घेतले. पेशव्यांना आधी जाऊन भेट घेतली नाही म्हणून ते रागावले असावेत असे चेन्नाला वाटले. तिला यात काही तरी काळेबेरे आहे असे वाटू लागले. आणि तिची शंका खरी ठरली. पेशव्यांनी राजाला पुण्याला अटकेत ठेवल्याची खबर तिला मिळाली. तिने आपल्या विश्वासातील आणि पोक्त अशा गुरूसिद्धप्पा या दरबाऱ्यास बोलावले आणि राजाच्या सुटकेसाठी प्रयत्न करण्यास पुण्याला रवाना केले.

परंतु आपल्या काळजीपायी, राणी आपल्या कर्तव्याला विसरलेली नव्हती. राजाच्या गैरहजेरीत तिने उत्तमप्रकारे राज्यकारभार सुरू केला. अशीच तीन वर्षे गेली. एक दिवस गुरूसिद्धप्पा अतिशय वाईट बातमी घेऊन आले. राजा मल्लसारजा कैदेत असताना आजारी पडला होता. पेशव्यांनी त्याची कालांतराने सुदका केली होती. तरीही पुण्याहून कित्तूरपर्यंतचा प्रवास त्यांना झेपला नव्हता आणि वाटेतच त्यांना मृत्यूने गाठले होते.

या अशुभ बातमीने साऱ्या कित्तूरवर शोककळा पसरली. राणी रुद्रम्मा आणि चन्नमांवर तर आभाळच कोसळले होते. परंतु राणी चन्नम्मा आपल्या पतीच्या तालमीत पूर्ण तयार झाली होती. तिने आपले दुःख बाजूला ठेवले आणि गुरूबसप्पांच्या सल्ल्यानुसार शिवलिंगरुद्राला गादीवर बसवले. आणि ती स्वतः त्याला मार्गदर्शन करू लागली.

दोन वर्षांत पेशवे आणि ब्रिटिशांमध्ये चकमकी झडू लागल्या. शिवलिंगचा मल्लप्पा नावाचा सल्लागार होता. त्याने शिवलिंगला सल्ला दिला की त्याने ब्रिटिशांना मदत करावी. म्हणजे ब्रिटीश पुढे कित्तूरवर मेहरनजर ठेवतील. परंतु राणी चन्नम्माला हा सल्ला पसंत नव्हता. "शिवा, तू इंग्रजांना मदत केलीस तर आपण गोत्यात येऊ. हे इंग्रज अतिशय सत्तालोलुप आहेत." परंतु शिवलिंगला पेशव्यांवर सूड उगवायचा होता. आपल्या पित्याच्या मृत्यूचा बदला घ्यायचा होता. म्हणून त्याने राजमातेचे ऐकले नाही. कित्तूरचे सैन्य, इंग्रजांच्या खांद्याला खांदा लावून लढले. बेळगावजवळ तुंबळ युद्ध झाले. पेशव्यांचा पाडाव झाला.

त्यानंतर राजा शिवलिंग रुद्र, आपल्या मल्लप्पा आणि व्यंकटराव या साथीदारांबरोबर सर थॉमस मन्रोला भेटण्यास गेला. मन्रो अतिशय लबाड व लोभी होता. त्याने शिवलिंगचे राजेपद ब्रिटिशांना मान्य आहे आणि त्या बदल्यात त्याने एक लाख सत्तर हजार रुपयांची खंडणी इंग्रजांना

देण्यास सांगितली. राजा शिवलिंगने या तहावर सही केली.

कित्तूरला परतल्यावर, त्याच्या या चुकीच्या निर्णयाची राजमातेने खूप निर्भर्त्सना केली. शिवलिंगच्या मते त्या तहनाम्यामुळे कित्तूर सुरक्षित होते. पण राणी चन्नमाला ब्रिटिशांचे थोडे वर्चस्वही मान्य नव्हते. तिला मल्लप्पा आणि व्यंकटरावाच्या चुकीच्या सल्ल्याचा हा परिणाम आहे, हे उमगले. गुरू सिद्धप्पानेही तिच्या या संशयाला पुष्टी दिली.

दरम्यान, राजा शिवलिंग रुद्र एकाएकी आजारी पडला. त्याला मुलगा नव्हता. त्यामुळे गादीला कोण वारस मिळणार, या चिंतेने त्याला घेरले होते. त्याला आपला शेवट जवळ आलेला दिसू लागला. तेव्हा त्याने राजमातेच्या म्हणण्यानुसार रीतसर विधी करून एक मुलगा दत्तक घेतला. गुरूबसप्पाने याच दिवशी योग्य सही, शिक्क्यासह ही बातमी धारवाडला असणाऱ्या ठाकरे या इंग्रज अधिकाऱ्याला खलित्याद्वारे कळवली.

ठाकरेने डॉ. बेल या आपल्या खास डॉक्टरांना कित्तूरला रवाना केले. राजा शिवलिंगच्या उपचारांसाठी त्याला पाठवले होते. परंतु तो कित्तूरला पोचण्यापूर्वीच राजा शिवलिंगला मृत्यू आला होता. ठाकरेने दत्तकविधानाचे कागदपत्र खोट्या सहीचे आहेत, असे ठरवून टाकले. त्यात स्वार्थी आणि सत्तालोलुप मलप्पा आणि व्यंकटरावाने ठाकरेचे कान फुंकण्यास सुरुवात केली. कित्तुरमध्ये बंडाळी माजली आहे आणि म्हणून स्वत: ठाकरेसाहेबाने त्यात लक्ष घालावे, असा लकडा त्यांनी त्याच्यामागे सुरू केला.

इकडे गुरूसिद्ध ठाकरेसाहेबाकडे मान्यतापत्र (दत्तकासंबंधी) घेण्यास आले. परंतु ठाकरेने त्याला साफ नकार दिला. दत्तकासंबंधीच्या अर्जात कपट असल्याचा दावा तो करू लागला आणि मि. चॅप्लीनकडे हे प्रकरण आपण पाठवणार असल्याचे सांगू लागला. त्याने गुरू बसप्पांना खूप दमदाटी सुरू केली.

राणी चन्नम्मा हे सर्व दडपशाहीचे प्रकरण ऐकून चिडली. "आत्तापर्यंत आम्ही इंग्रजांपुढे मदतीसाठी कधीच हात पसरले नव्हते. आणि यापुढेही पसरणार नाही. आणि त्यांची भलती ढवळाढवळ तर खपवूनच घेणार नाही." ती गुरूसिद्ध बसप्पांना म्हणाली. एवढ्यात ठाकरेसाहेब आपल्या खास फौजेसह कित्तूरची पाहणी करण्यासाठी किल्ल्याच्या दिशेने येत असल्याचे तिला कळले. परंतु तोपर्यंत त्यांनी राणीच्या कोषागाराचा ताबादेखील घेतलेला होता. आणि इंग्रज पहारेकरी त्यावर राखण करण्यासाठी बसवलेले होते. यामुळे कित्तूरच्या राणीलाच नव्हे, तर साऱ्या दरबाऱ्यांना, प्रजाजनांना इंग्रजांचा अतिशय राग आला. राणीने जाहीर केले की ती यापुढे इंग्रजांचा अगोचरपणा अजिबात सहन करणार नाही. न्यायासाठी ती लढण्यासही तयार झाली. तिने चॅप्लीनकडेही आपल्यावर होणाऱ्या अन्यायाची दाद मागून पाहिली. परंतु व्यर्थ ! साऱ्या राज्याच्या कानाकोपऱ्यात इंग्रजांच्या या गैरवागणुकीची बातमी पसरली. साऱ्या प्रजाजनांनी राणी चन्नमाला पाठिंबा दिला. आणि ती घेईल त्या निर्णयाला स्वीकारण्याची तयारी दर्शवली.

हळूहळू कित्तूरचा किल्ला म्हणजे सशस्त्र सैनिकांची गजबजलेली एक छावणी बनली. ठाकरेला याचा सुगावा लागला. त्याने परत कित्तूरला जाऊन राणीची भेट घेण्याचे ठरवले. कित्तूरच्या किल्ल्याबाहेर तो पोचला. परंतु त्याचे महाद्वार बंद होते. त्याने ताबडतोब महाद्वार उघडून त्याला आत येण्यास रस्ता देण्यास सांगितले, परंतु त्याला काहीच उत्तर मिळाले नव्हते. त्याने राणीला ओरडून सांगितले, "मी तुम्हाला चोवीस मिनिटांचा अवधी देत आहे. त्या वेळात तुम्ही हे महाद्वार उघडा. नाहीतर माझ्या तोफा डागून, मी स्वत:च दार उघडण्याची व्यवस्था करेन."

राणी चन्नम्माने ठाकरेचे आव्हान ऐकलेले होते. तिला मनोमन ठाऊक होते की आपला पाडाव या बलाढ्य ठाकरेसाहेबापुढे लागणे अवघड आहे.

तिला काय करावे, असा पेच पडला. परंतु त्या वेळेस आपला मृत पती परत आपल्याला कर्तव्य श्रेष्ठ मानण्यास सांगत आहे असा भास तिला झाला. तिने गुरूसिद्धप्पांना सांगितले, "आपण सारे सैन्य सज्ज ठेवा. मी स्वतःही ही लढाई लढणार आहे. मी आधी राज्यकर्ती, देशभक्त आणि मग एक स्त्री आहे." तिच्या साऱ्या दरबाऱ्यांनी तिला युद्धात न उतरण्यास सांगितले. परंतु तिचा निश्चय अटळ होता. हातात तलवार परजत, घोड्यावर मांड ठोकून ती आपल्या सैन्याच्यासमोर आली.

चोवीस मिनिटे संपण्याआधीच राणीचे सैन्य महाद्वारातून वादळाप्रमाणे बाहेर आले आणि इंग्रजांवर तुटून पडले. राणी चन्नमा चंडिकेप्रमाणे पराक्रम गाजवत, आपल्या सैनिकांना प्रोत्साहन देत होती. गुरूसिद्धप्पांनीही आपली तलवारबाजी आवेशात चालू ठेवली. सय्यद बलप्पा नावाचा राणीचा अंगरक्षक होता. त्याने बंदुकीचा नेम धरून ठाकरेला टिपले आणि इंग्रज सैन्यात हाहाकार उडाला. अनेक इंग्रजांना अटक केली आणि राणीने हे युद्ध जिंकले.

परंतु या एवढ्या यशामुळे ती बेसावध राहणार नव्हती. चॅप्लीनसाहेब काहीतरी हालचाल करणार हेही ती ओळखून होती. एका स्त्रीच्या हातून पराभव पत्करावा लागल्याने, तोही चिडला होता. त्याने कित्तूरच्या राणीला धडा शिकवण्याचे ठरवले. मुंबई, मद्रास, येथून त्याने कुमक मागवली आणि भलेमोठे सैन्य घेऊन तो कित्तूरकडे रवाना झाला. परंतु तो अधिक धोरणी होता. बेळगावला तळ ठोकून, तो आपल्या तोफखान्याची वाट पाहत होता. राणीही तेवढीच मुत्सद्दी होती. लढून अनेकांचे बलिदान देण्यापेक्षा वाटाघाटी करून मार्ग काढण्यासाठी तिने आपला दूत साहेबाकडे पाठवला. परंतु कोणत्याही परिस्थितीमध्ये शरणागती पत्करायची नाही, असे तिने ठरवले.

चॅप्लिनने आपले कैदी असलेले सैनिक आधी सोडावेत, असा आग्रह

धरला. राणीने ती अट्ही मान्य केली. परंतु चॅप्लीन लबाड निघाला. त्याने किल्ल्याच्या चारी बाजूंस तोफा डागल्या आणि राणीविरुद्ध युद्धाची आघाडी उघडली. राणी चन्नम्माही याला तयार होती. तिनेही इंग्रजांना प्रत्युत्तर द्यायला सुरुवात केली. परंतु इंग्रजांचा तोफखाना अफाट होता. किल्ल्याच्या एका तटाला त्याने प्रचंड भेगा पाडण्यास सुरुवात केली. पाहता पाहता फटींचे भले थोरले भगदाड झाले. सारी इंग्रज फौज त्यातून आत शिरली. राणी आणि सारे कित्तूरचे सैन्य प्राण पणाला लावून लढले. परंतु चॅप्लीनच्या अवाढव्य सेनेपुढे त्यांचा टिकाव लागला नाही. राणी चेन्नम्माला अटक करण्यात आली.

आपला ध्वज उतरवून, किल्ल्यावर इंग्रजांचा ध्वज फडकला गेल्याचे राणीने साश्रू नयनाने पाहिले. परंतु अखेरपर्यंत आपण शरण आलो नाही, याबद्दल तिला अभिमान वाटत होता. तिला बैलाहोंगालाच्या किल्ल्यावर इंग्रजांनी कैद करून ठेवले. तेथे पाच वर्षांनी तिला मृत्यू आला.

आजंही कर्नाटकात राणी चन्नम्माच्या शौर्याचे पोवाडे गायले जातात. झाशीच्या राणीप्रमाणे ब्रिटिशांशी धैर्याने टक्कर देणारी, ही वीरांगना थोर होती.

भामिनी



प्राचीन गुजराथमध्ये हाडाराणीसारख्या अनेक कर्तव्यकठोर आणि देशभक्त स्त्रिया होऊन गेल्या आहेत. त्यांचे नाव आणि त्यांच्या परंपरांना उजाळा देण्याचे काम आजही काही गुजराथकन्या करत आहेत. त्यातील अंजार गावातील ईश्वरलालांच्या भामिनीची कथा उद्बोधक आहे.

ईश्वरलाल हिरमुसले होऊन घरी आले होते. आजच त्यांच्या पत्नीची प्रसूती झाली होती. या तिसऱ्या खेपेला तरी परमेश्वर आपल्यावर प्रसन्न होईल आणि वंशदीप तेवत ठेवणारा मुलगा जन्माला येईल, अशी आशा उभय पति-पत्नींना होती. दहा-बारा वर्षांच्या भामिनीने पित्याचा हिरमुसला चेहरा पाहिला आणि काय ओळखायचे, ते तिने ओळखले. ईश्वरलाल खचल्यागत झाले होते. "बेटा, ईश्वर माझ्यावर इतका का कोपला आहे ? मुलगा नाही म्हणजे माझे नाव पुढे चालणार नाही. हे दुःख मला आहे. पण त्याबरोबर तुम्हा तिघींची लग्नं कशी होणार, ही चिंता आहे. त्यामुळे मेलो तर अग्नी द्यायला मुलगाही नही."

कोवळ्या भामिनीला वडलांचे हे बोल यातना देत होते. त्याचा खोल अर्थ कळण्याचे तिचे वय नव्हते. परंतु आपल्या पित्याच्या हृदयाला पडणारा पीळ, तिलाही दुःखी करत होता. ईश्वरलालांचे त्या दिवशीचे बोल छोट्या भामिनीच्या आयुष्याला नवे वळण लावून गेले. गुजरात-सौराष्ट्रातील अंजार हे गाव फार मोठे नव्हते. भामिनीला शाळेत

घातलेले होते, तरीदेखील आधुनिक शहरांपेक्षा त्या गावचे, शाळेचे वातावरण भिन्न होते.

उलटणाऱ्या प्रत्येक महिन्याबरोबर ईश्वरलाल आणि त्यांची पत्नी यांच्यावरील दडपण आणि चिंतेचे ओझे वाढतच चालले होते. भामिनी मूकपणाने त्याचे निरीक्षण करे. बागडणारी स्वच्छंदी भामिनी त्यामुळे हळूहळू अंतर्मुख बनली होती. तिच्या बालमनात अनेक प्रश्नांचे वादळ उठलेले होते. "आई-वडिलांचे नाव मुलीच्या कर्तृत्वामुळे का चालत नाही? माझं लग्न झालं, तरीदेखील काय झालं? आई-बाबांच्या वृद्धापकाळात मी त्यांची काठी बनेन." परंतु रूढी आणि परंपराप्रिय पित्याला हे विचार भामिनी बोलून दाखवू शकत नसे. परंतु तिच्या मनाची घडण मात्र एक वेगळाच आकार घेत गेली.

भामिनी पाहता-पाहता वयात आली. वयात आलेल्या मुली घरात असल्याने ईश्वरलालांची झोपच जणू उडाली. एकेकीचे हात पिवळे केले की आपण सुटलो, असे त्यांना वाटत होते. ईश्वरलाल सतत मरणाच्या गोष्टी करत. अखेर एक दिवस भामिनीला राहावले नाही. चिंताक्रांत पित्याला ती म्हणाली, "बाबा, मी लहान तोंडी मोठा घास घेऊन थोडं बोलू का?"

"बोल बेटा, तुला काय बोलायचं आहे?" ईश्वरलाल म्हणाले.

"बाबा, लहानपणापासून मी तुमच्याकडून, 'मी मेल्यावर कसं होईल? आम्हाला अग्नी कोण देईल?' हे ऐकत आहे. बाबा, तुम्हाला मी वचन देते की, मी सासरी असले तरीही मोठ्या मुलीचे म्हणजे मुलाचे कर्तव्य यथायोग्य पार पाडेन."

भामिनीच्या शांत आणि गंभीर चेहऱ्यावर निश्चयाचे आणि कर्तव्यकठोरतेचे तेज झळकत होते. एका खारीने श्रीरामाला सेतू बांधण्यास मदत करण्याच्या प्रयत्नासारखाच तिचा हा निश्चय होता.

आपल्या समाजात अंधश्रद्धा, रूढी आणि परंपरांची पाळेमुळे पार खोलवर रुजलेली आहेत. त्यांना उपटून काढून फेकून देण्यासाठी एक भामिनी थोडीच पुरी पडणार होती ? पण सामाजिक क्रांती ही भडकणारी आग नसते. संथ परंतु भक्कम पावले टाकत ती समाजाला योग्य मार्गावर आणत असते. भामिनीदेखील वेगळ्या प्रकारे वैचारिक क्रांती घडवून आणण्याचा, समाजाला नवी दिशा दाखवण्याचा प्रयत्न करूनच पतिगृही गेली होती.

यथावकाश भामिनीचा विवाह झाला. भामिनीचे विश्व बदलले. तिच्यावरील जबाबदाऱ्या वाढल्या. नवेनवे अनुभव तिच्या पदरी आले. युगानुयुगे स्त्री पुरुषाला पडछायेसारखी साथ देते. त्याच्या बरोबर संसाराची दुःखे झेलते. तरीदेखील माहेरी आणि सासरी तिला दुय्यम नागरिकत्व का, या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा आणि त्याप्रमाणे कृती करण्याचा, तिचा दृढनिश्चय वाढत चालला होता.

काळ वाऱ्याच्या वेगाने चालला होता. पाहता पाहता ईश्वरलाल आपल्या मुलींचे विवाह उरकून थोडे मोकळे झाले होते. तिन्ही मुली सुस्थळी पडल्या होत्या. सुखाने संसार करत होत्या. त्यामुळे ईश्वरलाल मनोमन सुखावले होते. आयुष्यभर कष्ट आणि काळजीच्या ओझ्याखाली दडपल्याने त्यांची प्रकृती खालावत चालली होती. एखादे जीर्ण वस्त्र हलक्या स्पर्शाने विरावे, तशी त्यांची देहयष्टी झाली होती.

भामिनीचे सासर अंजारलाच होते. त्यामुळे वारंवार पित्याकडे जाऊन त्यांची चौकशी ती करत असे. आपला संसार सांभाळून त्यांची जेवढी सेवा शक्य होती, तीदेखील भामिनी करत होती. ईश्वरलाल मनोमन जाणून पावले होते की, एखाद्या कर्त्या सवरत्या मुलाहून अधिक सेवा भामिनी करत आहे.

"भामिनी, मी फार दिवसांचा सोबती राहिलेलो नाही. माझ्यामागे

तुझ्या आईची काळजी घे. तिला म्हातारपणी एकलेपणाचे जीवन जगू देऊ नकोस." ईश्वरलाल भामिनीला नेहमी सांगू लागले. पित्याचा हात हातात घेऊन भामिनी त्यांना दिलासा देत असे. त्यांच्या आयुष्याच्या अखेरच्या काळात, त्यांच्या चिंतेचे ओझे आपल्यावर घेत असे. परंतु "मला अग्नि कोण देणार ? माझ्या मुखात मुलाने गंगा घातली नाही, तर मला स्वर्गात जागा मिळेल का ?" पित्याच्या नजरेत चमकणारे हे प्रश्न भामिनी वाचत होती.

एक दिवस ईश्वरलालांना यमदूताचा सांगावा घेऊन उगवला. पित्याच्या निधनामुळे भामिनीला अपार दुःख झाले. आपल्या वृद्ध आईकडे आणि धाकट्या बहिणींच्या शोकाकडे पाहून तिने आपले दुःख आवरते घेतले. पाहता पाहता नातेवाईक, शेजारी गोळा झाले. दुःख बाजूला सारून, पुढचे कठोर कर्तव्य करण्याचे काम अजून व्हायचे होते. जमलेल्या आप्तगणात अस्वस्थ कुजबूज सुरू झाली. शोकाकुल भामिनीला कसे आणि काय सांगावे, हे त्यांना कळेना. अखेर धीर करून एक पोक्त आप्त पुढे आले.

"भामिनी, तू सर्वांत मोठी म्हणून तुझ्याशीच बोलतो. तुझ्या चुलत भावाकडून पुढची क्रियाकर्मं उरकून..." त्यांचे बोल मध्येच तोडून भामिनी उद्गारली, "आम्ही तिघी मुली असताना, दादाकडून पुढचे कार्य का करायचे ? मी सर्वांत मोठी मुलगी, या नात्याने पित्याला अग्नी देण्याचा अधिकार आणि कर्तव्य माझे आहे."

सारेजण अवाक होऊन तिच्याकडे पाहू लागले. याबाबत आपल्या पतीची परवानगी भामिनीने केव्हाच घेऊन ठेवलेली होती. शहांच्या घराची समस्या न राहता, साऱ्या गावाची ही समस्या झाली. हां हां म्हणता साऱ्या अंजार गावात ही बातमी पसरली. अनेक धर्मरक्षक सरसावून पुढे आले. "भामिनी, तुझ्या या कृत्याने धर्म भ्रष्ट होत आहे. आम्ही तुला असे करू

देणार नाही." अनेकांनी तिला विरोध करण्याचा प्रयत्न केला.

परंतु भामिनीने केव्हाच निर्णय घेतलेला होता. त्यापासून ती मागे सरणार नव्हती. पित्याच्याकडे पाहून तिने मनोमन ठरवले, "कितीही विरोध झाला तरी बेहत्तर ! परंतु मीच तुम्हाला अग्नी देणार आहे." तिच्या चेहऱ्यावर निश्चयाचे वेगळे तेज पसरले होते. आपल्याबरोबर स्मशानात कोणी आले नाही तरी चालेल, हे देखील तिने स्पष्ट केले.

"मुलगी, स्त्री हेदेखील मुलगा जसा जन्म घेतो, तशीच जन्म घेते ना ? मग तिला हा अधिकार धर्माने आणि समाजाने का डावलावा ?" तिने सर्वांपुढे परखड प्रश्न टाकला. डोळ्यावर अंधश्रद्धा, जुनाट विचारांची झापडे बांधून जगणाऱ्या समाजाचे वैचारिक प्रबोधन करायचे तिने ठरवले.

भामिनीच्या अटळ धैर्यापुढे आणि परखड, बुद्धिवादी विचारांपुढे इतरांना माघार घ्यावी लागली. भामिनीने सर्व आप्त, समाज आणि गावकऱ्यांच्या विरोधाला न जुमानता आपले कर्तव्य पार पाडले.

भामिनीसारख्या बुद्धिवादाचे शस्त्र करून, समाजाच्या अनिष्ट रूढींशी लढणाऱ्या वीरांगनांना शतशः प्रणाम !


म. वं. सं. ठाणे, ग्रंथालय शाखा.
वर्ग : ...
क्र. क्र. २५५० दिनांक २३/५/१९
विषय बा.वि.

BVBK-0402550